# नियंत्रक कार्यालय,
## वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

फोन नं. नियंत्रक कार्यालय : (०२४५२) २२५४२४


जा.क्र.सीएफपी/आस्था/ ९५० /२०२४ दिनांक ०१/०४/२०२४ ०३

विषय : केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई मार्केटप्लस (GeM) पोर्टलच्या माध्यमातून खरेदी प्रक्रिया राबविणे बाबत.

संदर्भ : १) महाराष्ट्र शासन निर्णय, उद्योग,उर्जा व कामगार विभाग दिनांक २४/०८/२०१७
२) महाराष्ट्र शासन निर्णय, उद्योग,उर्जा व कामगार विभाग दिनांक १२/०९/२०२२
३) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी चा Chemical and Glassware चा दर करार

### परिपत्रक

महाराष्ट्र शासन निर्णय, उद्योग,उर्जा व कामगार विभाग दिनांक २४/०८/२०१७ अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्य कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दती धोरणामध्ये सुधारणा करुन केंद्र शासनाने विकसीत केलेल्या गव्हर्नमेंट ई मार्केटप्लस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती राज्य शासनास वस्तु व सेवा खरेदी साठी स्विकृत केलेली आहे व ती खरेदी धोरण शासन निर्णय दिनांक ०१/१२/२०१६ मधिल परिच्छेद क्रमांक २.४ मध्ये नमुद केलेल्या विभागांना / कार्यालयानां बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र शासन निर्णय, उद्योग,उर्जा व कामगार विभाग दिनांक १२/०९/२०२२ मधिल परिच्छेद क्रमांक ०१ अन्वये शासकीय अनुदानीत संस्थाना गव्हर्नगेंट ई मार्केटप्लस (GeM) पोर्टलवरुन खरेदी करणे बाबत बंधनकारक केलेले आहे.

सबब, सर्व कार्यालय प्रमुख / आहरण व संवितरण अधिकारी यांना कळविण्यात येते की, सर्व साहित्य / वस्तू खरेदीसाठी उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय व परिपत्राका मधील तरतूदीचे पालन करावे. तसेच विद्यापीठाचा Chemical and Glassware खरेदीसाठी केलेला दर करार दिनांक ३१/०३/२०२४ रोजी संपूष्ठात आलेला आहे. तेंव्हा सदरील Chemical and Glassware ची खरेदीसुध्दा महाराष्ट्र शासन निर्णय, उद्योग,उर्जा व कामगार विभाग दिनांक २४/०८/२०१७ अन्वये शासनाने विकसीत केलेल्या गव्हर्नमेंट ई मार्केटप्लस (GeM) पोर्टलवर करण्यात यावी.

मा.कुलगुरु यांच्या आदेशान्वये.

Bimal
नियंत्रक
**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ**
**परभणी**

प्रत :

१. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि) /संचालक संशोधन / संचाल विस्तार शिक्षण, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
२. सर्व कार्यालय प्रमुख / आहरण व संवितरण अधिकारी, वनामकृवी, परभणी यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव
३. कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना माहितीस्तव.
४. पुर्वलेखा परिक्षण अधिकारी, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव
५. मा.कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचे खाजगी सचिव यांना माहितीस्तव.
६. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, वनामकृवी, परभणी यांना देवुन कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या वेब साईटवर सोबत जोडलेल्या शासन निर्णयासह Upload करावे.

**<u>शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दती धोरणामध्ये सुधारणा</u>**
**केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती राज्य शासनास वस्तू व सेवा खरेदीसाठी स्विकृत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२१५/उद्योग-४**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २४ ऑगस्ट, २०१७

**<u>पहा:</u>**- १. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस-१०८८/(२५१२)/उद्योग-६, दिनांक २ जानेवारी, १९९२.
२. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस-२०१४ प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५.
३. शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस-२०१४ प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६.

**<u>प्रस्तावना-</u>**

केंद्र शासनाने राष्ट्रीय खरेदी धोरणांतर्गत (National Public Procurement Policy) खरेदी प्रक्रियेत मोठया प्रमाणात बदल केले आहेत. शासकीय विभाग/संस्थांकडून वस्तु व सेवांच्या खरेदीसाठी केंद्र शासनाने गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) हे पोर्टल विकसित केलेले आहे. GeM पोर्टलवर खरेदी करताना खरेदीदार विभागाच्या गरजेनुसार निविदा फॉर्म, वस्तुनिहाय विर्निर्देशामध्ये बदल करण्याची सुविधा पोर्टलवर उपलब्ध असून, पोर्टलद्वारे राबविण्यात येणारी खरेदी पध्दती ही मानवी हस्तक्षेपाशिवाय असून संपूर्णत: ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येणार आहे. यामुळे, खरेदी कार्यपध्दतीत पारदर्शकता येऊन नेमक्या व योग्य नामांकित दर्जाच्या वस्तुंचा पुरवठा वाजवी किंमतीत उपलब्ध होणार आहे.

गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) या पोर्टलच्या वापरामुळे शासकीय विभागाद्वारे होणाऱ्या खरेदी प्रक्रियेच्या कालावधीमध्ये बचत, उत्कृष्ठ वस्तूंचा पुरवठा, वाजवी किंमत व संपूर्ण खरेदी प्रक्रियेमध्ये पारदर्शकता येणार आहे. या सर्व बाबींचा विचार करुन केंद्र शासनाने विकसित केलेल्या GeM पोर्टलवरून करावयाच्या खरेदीची कार्यपध्दती राज्य शासनास लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुसार, शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय-**

केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती, राज्य शासनास वस्तू व सेवा खरेदी करण्यासाठी स्विकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. खरेदीची सुधारित नियमपुस्तिका दिनांक ०१/१२/२०१६ मधील परिच्छेद क्र.३.२.२ व ३.२.३ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा व गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलच्या वापरासाठी खालीलप्रमाणे सुचना करण्यात येत आहेत.

१. गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवर खरेदीसाठी उपलब्ध असलेल्या वस्तू व सेवांचे दोन किंवा त्यापेक्षा जास्त पुरवठादार असतील तर सदरच्या वस्तू व सेवांची गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवर खरेदी करण्यास, खरेदी धोरण दिनांक ०१/१२/२०१६ मधील परिच्छेद २.४ मध्ये नमुद केलेल्या लक्ष्यांकित विभागांना/कार्यालयांना बंधनकारक करण्यात येत आहे.

२. राज्य शासनाच्या सर्व खरेदीदार विभागांनी गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवर खरेदी करण्यासाठी त्यांच्या कार्यालयीन ई-मेलसह सदर पोर्टलवर नोंदणी करावी. त्यासाठी खरेदीदार विभागांना महासंचालक, पुरवठा आणि विल्हेवाट (DGS&D) व विकास आयुक्त (उद्योग), मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, उद्योग संचालनालय, मुंबई यांनी सहकार्य करावे.

३. खरेदीदार विभागास गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवर उपलब्ध असलेल्या वस्तू व सेवा रू.५०००/- ते रू.५०,०००/- पर्यंतची खरेदी, योग्य दर्जा, विनिर्देश व पुरवठा कालावधीची पूर्तता करणाऱ्या पुरवठादाराकडून गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवर करण्यात यावी. तथापि, सदर वस्तू गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवर उपलब्ध नसल्यास व पुरवठादारांची स्थानिक पातळीपर्यंत वस्तू पुरवठा करण्याची तयारी नसल्यास अशा खरेदी किंमतीच्या वस्तू दरपत्रके/निविदा न मागविता थेट जागेवर खरेदी करता येतील. परंतु अशा वस्तू व सेवांची एकूण खरेदी त्या त्या आर्थिक वर्षात रू. ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

४. जेव्हा खरेदीची किंमत रू. ५०,०००/- पेक्षा जास्त व रू. ३ लाखापर्यंत असेल तेव्हा गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवर उपलब्ध असलेल्या अशा वस्तू व सेवांची खरेदी योग्य दर्जा, विर्निदेश व पुरवठा कालावधीची पूर्तता करणाऱ्या निम्नतम (एल-१) पुरवठादारांकडून व किंमतीच्या वाजवीपणाची खातरजमा करून स्पर्धात्मक निविदेशिवाय खरेदी करण्यास खरेदीदार विभागांना मुभा राहिल. परंतु अशा वस्तू व सेवांची एकूण खरेदी त्या त्या आर्थिक वर्षात रू. ३ लाखापेक्षा जास्त नसावी.

दरपत्रक सादर करणाऱ्या निविदाकारांचा खरेदी कार्यालयाबरोबर कोणताही हितसंबध नसावा. यापूर्वी असे दिसून आले आहे की, खरेदी अधिकारी मोठे आदेश लहान लहान आदेशांमध्ये विभागणी करतात आणि ते त्याच विक्रेत्यांकडून दरपत्रकाच्या माध्यमातून खरेदी करतात. ही प्रथा काटेकोरपणे टाळण्यात यावी.

५. खरेदीदार विभागास गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवर उपलब्ध असलेल्या वस्तू व सेवांची रू. ३ लाख व त्यावरील खरेदी सदर पोर्टलवरील पुरवठादारांकडून वस्तू व सेवांची गुणवत्ता, विनिर्देश आणि पुरवठा कालावधी इ. आवश्यक बाबी तपासून स्पर्धात्मक ऑनलाईन निविदाद्वारे (Online bidding) किंवा रिव्हर्स ऑक्शन पध्दतीने खरेदी करण्यात यावी.

उपरोक्त प्रमाणे GeM पोर्टलवर खरेदीची कार्यपध्दती अवलंबितांना खरेदीदार विभागांनी उद्योग विभागाच्या दिनांक ०१.१२.२०१६ रोजीच्या खरेदी धोरणातील तरतूदींचा अवलंब करावा. आवश्यकता वाटल्यास उद्योग विभाग एक वर्षानंतर याबाबतचा आढावा घेऊन आवश्यक ते पुनर्विलोकन करेल.

६. खरेदीदार विभागांनी गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) वरील विविध सेवा स्थानिक स्तरावर उपलब्ध असल्याची खातरजमा करून (GeM) पोर्टलवरील पुरवठादारांकडून सेवांची गुणवत्ता, विनिर्देश आणि पुरवठा कालावधी इ. आवश्यक बाबी तपासून, अशा सेवा पोर्टलचा अवलंब करून उपलब्ध करून घेता येईल.

७. विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तू स्वरूपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तातंरण रोख स्वरूपात, थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करणेबाबत नियोजन विभागाचा शासन निर्णय दिनांक ०५/१२/२०१६ च्या अनुषंगाने नमुद करण्यात आलेल्या तरतुदीचा समावेश याअंतर्गत अंतर्भूत नाही. त्या पुर्ववत उपरोक्त शासन निर्णय व त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांच्या अनुषंगाने राबविण्यात याव्यात.

८. गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवर उपलब्ध असलेली वाहने (मोटार कार) खरेदीदार विभागांना खरेदी करण्यास मुभा राहील. तथापि, दिनांक ०१/१२/२०१६ मधील सुधारित खरेदी धोरणांतर्गत ३.२.३ मध्ये वाहन

खरेदीच्या संदर्भात नमुद करण्यात आलेल्या तरतुदी यापुढेही पुर्ववत राहतील. कोणत्याही वाहनांचे दरकरार DGS&D कडे उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक/वितरक यांच्या दरपत्रकामार्फत देखील करता येईल. तथापि, मोटारवाहन खरेदी रू. १ कोटी पेक्षा जास्त असल्यास, सदर खरेदी ई-निविदा प्रक्रियेमार्फतच करण्यात यावी. अशा सर्व खरेदीचा तपशिल खरेदीदार विभाग त्यांच्या संकेत स्थळावर आणि ई-निविदेच्या पोर्टलवर प्रसिध्द करेल.

९. राज्य शासनाच्या खरेदीदार विभागांना खरेदी करण्यात आलेल्या वस्तुंची देयके पुरवठादारांना दहा दिवसांच्या आत अदा करण्यासाठी, राज्य शासनाचे BEAMS हे पोर्टल तीन महिन्याच्या आत GeM पोर्टलशी संलंग्न करण्यात येईल. सदरची कार्यवाही वित्त विभागाने माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या समन्वयाने करावी.

१०. केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाकडून GeM कार्यपध्दतीच्या बाबत General Financial Rules (GFR),मध्ये भविष्यात ज्या ज्या सुधारणा करण्यात येतील त्यांचा आढावा मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठित उच्चाधिकार समिती वेळोवळी घेईल.

११. शासनाच्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्था महानगरपालिका/नगरपालिका/जिल्हा परिषदा/ महामंडळ/ मंडळ/ अंगीकृत व्यवसाय/उपक्रम/शासकिय कंपनी/स्वायत्त संस्था व शासनाच्या मालकीची व नियंत्रणाखाली असलेली कोणतीही संस्था यांनी पुरवठादारांना देयके दहा दिवसाच्या आत अदा करण्यासाठी त्यांची बँक खाती गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार सदर पोर्टलशी संलंग्न करण्यासंदर्भात तीन महिन्यात कार्यवाही पूर्ण करावी.

१२. ज्या वस्तू गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवर उपलब्ध नसतील अथवा पुरवठादार त्या ठिकाणी पुरवठा करण्यास तयार नसेल तर अशा वस्तू खरेदीदार विभागांना दिनांक ०१/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील विहित कार्यपध्दतीचा व तरतुदींचा अवलंब करून खरेदी करण्यास मुभा राहील.

१३. उपरोक्त नमूद सुधारणा व्यतिरिक्त, खरेदीदार विभागांना सुधारित खरेदी नियमपुस्तिका शासन निर्णय ०१.१२.२०१६ मधील खरेदीबाबतच्या इतर सर्व तरतुदी पुर्ववत लागू राहतील.

१४. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचेकडील अनौपचारिक संदर्भ क्र. १४३/२०१७ दिनांक ०६ जून, २०१७ ला अनूलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१७०८२४१२३५१६२११० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Namdeo
Kondiba Bhosale

Digitally signed by Namdeo Kondiba Bhosale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=IEL Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db1ca2341132b954db9052b5ef3bd93e7410456a96fa70df7ff81c68231fcd3, serialNumber=8c6a286229ecc7982a08553f49d547ef64be25c7f26fc96324ece7cccbfeb8c5, cn=Namdeo Kondiba Bhosale
Date: 2017.08.24 12:25:49 +05'30'

**( डॉ.ना.कों.भोसले )**
उप सचिव (उद्योग)

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

३) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,

४) महाराष्ट्र राज्यातील सर्व मा. संसद सदस्य

५) महाराष्ट्र राज्यातील सर्व मा. विधानसभा व विधापरिषद सदस्य
६) मा. मुख्य सचिव
७) सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
८) प्रबंधक, मूळ न्यायशाखा, उच्च न्यायालय, मुंबई/नागपूर/औरंगाबाद (पत्राने)
९) प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई/नागपूर/औरंगाबाद (पत्राने)
१०) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
११) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई (२ प्रती)
१२) प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१३) महाराष्ट्र राज्यातील सर्व मुख्य माहिती आयुक्त यांचे उप सचिव
१४) विकास आयुक्त, (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई ४०० ०३२
१५) सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
१६) पोलिस महासंचालक, मुंबई
१७) नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८) आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, ३ रा मजला, मध्यवर्ती शासकीय इमारत, पुणे ४११००१
१९) आयुक्त (पशुसंवर्धन), महाराष्ट्र राज्य, पुणे
२०) आयुक्त (मत्स्यव्यवसाय), तारापोरवाला मत्सालय, चर्नी रोड, मुंबई
२१) आयुक्त (दुग्धव्यवसाय), वरळी दुग्धशाळा, वरळी सी फेस, मुंबई
२२) शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
२३) संचालक, लेखा व कोषागारे, प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई
२४) विक्रीकर आयुक्त्, विक्रीकर भवन, माझगाव, मुंबई
२५) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई
२६) संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२७) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, शासकीय दंत महाविद्यालय, सीएसटी, मुंबई
२८) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
२९) साखर आयुक्त, साखर आयुक्तालय, पुणे
३०) पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३१) संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर
३२) आयुक्त, महिला व बालविकास पुणे
३३) अप्पर पोलिस महासंचालक व कारागृह महानिरिक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे
३४) मंत्रालयाच्या निरनिराळया विभागांखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख (संबंधित प्रशासकिय विभागांच्या मार्फत)
३५) सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
३६) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
३७) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई
३८) महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई
३९) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर
४०) महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र -२, नागपूर

४१) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई ४०० ६१४
४२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
४४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
४५) सर्व आयुक्त,महानगरपालिका, महाराष्ट्र राज्य
४६) सर्व नगरपरिषदांचे मुख्य अधिकारी
४७) सदस्य सचिव, महाराष्ट्र पोल्युशन कंट्रोल बोर्ड, छत्रपती शिवाजी मार्केट बिल्डींग, ४ था मजला, पलटन रोड, मुंबई ४०० ००१
४८) महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई ४०० ००८
४९) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वीज मंडळ, हाँगकाँग बिल्डींग, महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०००0१
५०) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ (सिकॉम), निर्मल बिल्डिंग, १ ला मजला, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१
५१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ, मुंबई
५२) व्यवस्थापकीय संचालक, कोकण विकास महामंडळ, वॉर्डन हाऊस, ५ वा मजला, सर पी.एम. रोड, मुंबई ४०० ००१
५३) व्यवस्थापकीय संचालक, मराठवाडा विकास महामंडळ, विकास भवन, डॉ. राजेंद्रप्रसाद मार्ग, औरंगाबाद ४३१००१
५४) व्यवस्थापकीय संचालक, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ, कुबेरा चेंबर्स, रेडक्रॉस हाऊस, संचेती हॉस्पिटलजवळ, डॉ. राजेंद्रप्रसाद रोड, पुणे ४११ ००५
५५) व्यवस्थापकीय संचालक,विदर्भ विकास महामंडळ, महाजन बिल्डींग, मेन रोड, सिताबर्डी,नागपूर-१२
५६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ, लोटस हाऊस, ३३-ए, न्यू मरीन लाईन्स, मुंबई ४०० ०२०
५७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक महामंडळ, प्लॉट क्र. २१४, बॅकबे रेक्लेमेशन, रहेजा सेंटर, १२ वा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१
५८) व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ,"कृपानिधी "९, वालाचंद हिराचंद मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३८
५९) अध्यक्ष, महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन, द्वारा :-सिकॉम, निर्मल बिल्डींग, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१
६०) व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र वन विकास महामंडळ, ६-ए, नवाज ले-आऊट, टिळक नगर, अमरावती रोड, नागपूर १०
६१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, ३७०, भाखुर्डा, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६
६२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, प्लॉट क्र. बी, सर्व्हे क्रमांक ५८३, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे ४११ ००९
६३) व्यवस्थापकीय संचालक, मत्स्यव्यवसाय विकास महामंडळ, एम.के.एम. इंटरनॅशनल हाऊस, १७८, बॅकबे रेक्लमेशन, बी. एम. चिनॉय मार्ग, मुंबई ४०० ०२०

६४) व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र तेलबिया, वाणिज्य आणि उद्योग महामंडळ, २०१, जॉली भवन क्रमांक २, २ रा मजला, न्यू मरीन लाईन्स, मुंबई ४०० ०२०

६५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ॲग्रीकल्चर फर्टिलायझर प्रमोशन महामंडळ (मॅपको) मिस्त्री भवन, ६ वा मजला, दिनशा वाच्छा मार्ग, मुंबई ४०० ०२०

६६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, मेंढी फार्म, गोखले नगर, पुणे ४११०१६

६७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वियाणे महामंडळ, प्लॉट क्रमांक ८, शास्त्रीनगर, पी. एन. नंबर १९, अमनखान प्लॅाट, अकोला ४४४ ००१

६८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, एम. एस.एच.सी. कॉम्प्लेक्स, सुत गिरणीमागे, उमर रोड, नागपूर ४४०००९

६९) व्यवस्थापकीय संचालक, महराष्ट्र वीजमार्ग महामंडळ, वाशानी चेंबर्स, १ ल मजला, न्यू मरीन लाईन्स, मुंबई ४०० ०२०

७०) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र भूविकास महामंडळ, न्यू ॲडमिनिस्ट्रेटिव्ह बिल्डिंग, ॲग्रीकल्चर कॉलेज कंपाऊंड, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

७१) उपाध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण प्रादेशिक विकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे(पूर्व), मुंबई ४०० ०५१

७२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र सिंचन विकास महामंडळ, न्यू ॲडमिनिस्ट्रेटिव्ह बिल्डिंग, ॲग्रीकल्चर कॉलेज कंपाऊंड, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

७३) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाकाली मार्ग, मरोल, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००९३

७४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र शहर आणि उद्योग विकास महामंडळ (सिडको), २ रा मजला, निर्मल बिल्डींग, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१

७५) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (BMRDA), गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१

७६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण महामंडळ, एन.सी.सी. नेहरू मेमोरियल हॉल, ४-ए,डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४०००० १

७७) महाव्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, जुहू सुप्रीम शॉपिंग सेंटर, गुलमोहर क्रॉस रोड नं. १, जे. व्ही. पी.डी. स्कीम (इतर) विलेपार्ले (प.) मुंबई ४०० ०४९

७८) व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, सी.डी.ओ. बॅरॅक क्रमांक ९, योगक्षेमजवळ, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०२०

७९) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, बालरक्षक विद्यालय, १९/२१, मनोहरदास मार्ग, मुंबई ४०० ००१

८०) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, आदिवासी विकास संकुल, न्यू ॲडमिनिस्ट्रेशन बिल्डींग, २ रा मजला, रमाबाई आंबेडकर गर्ल्स स्कूलजवळ, जूना आग्रा रोड, नाशिक -२

८१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य चर्मोद्योग विकास महामंडळ, बॉम्बे लाईफ बिल्डींग, ४५, वीर नरीमन मार्ग, ५ वा मजला, मुंबई ४०० ०२३

८२) व्यवस्थापकीय अधिकारी, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, एक्सप्रेस टॉवर, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२०

८३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, फिल्मसिटी, गोरेगाव (पूर्व), मुंबई ४०० ०६५

८४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, अभ्यंकर नगर, नागपूर ४४० ०१०

८५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विदेश सेवा योजन व निर्यात प्रचालय महामंडळ (MOPBC) एक्स. के. बिल्डींग, २ रा मजला, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलॉर्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३८

८६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, ९ वा मजला, न्यू एक्सेलसियर बिल्डिंग, अमृत केशव नायक मार्ग, मुंबई ४०० ००१

८७) व्यवस्थापकीय संचालक, कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ लिमिटेड, बॉम्बे मोरेवाडी, तालुका करवीर, जि. कोल्हापूर

८८) व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, बिल्डींग क्रमांक ५, व्ही. आर. देसाई रोड, आझाद नगर क्रमांक २, अंधेरी (प.) मुंबई ४०० ०५८

८९) व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, जुहू सुप्रीम शॉपिंग सेंटर, गुलमोहर क्रॉस रोड, क्रमांक ९, जे.व्ही. पी.डी. स्कीम (उत्तर),विलेपार्ले (प.), मुंबई ४०० ०४९

९०) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी संघ (महाटेक्स), १ ला मजला, वाशानी चेंबर्स, ४७,सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, मुंबई

९१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक खरेदी विक्री संघ, गौतम बिल्डींग, झकेरिया बंदर रोड, शिवडी, मुंबई ४०००१५

९२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य तेलबिया उत्पादक सहकारी संघ, २४, रामदार कॉलनी, शिलापेठ, जळगाव- ४२५००१

९३) सदस्य सचिव व संचालक, महाराष्ट्र उर्जा व विकास संस्था (MEDA) न्यू कामानी चेंबर्स, रामजीभाई कामानी मार्ग, बॅलॉर्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३८

९४) संचालक, हाफकिन इन्स्टिटयूट फॉर ट्रेनिंग रिसर्च ॲण्ड टेस्टींग, आचार्य दोंदे मार्ग, परेल, मुंबई ४०० ०१२

९५) वेलफेअर कमिशनर, महाराष्ट्र लेदर वेलफेअर बोर्ड, मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, बॅलॉर्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३०

९६) संचालक, माजी सैनिक प्रशिक्षण उत्पादन केंद्र, सातारा

९७) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागातील सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव /कार्यासने

९८) निवड नस्ती (उद्योग ४).

केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलच्या माध्यमातून खरेदी प्रक्रिया राबविणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, उर्जा व कामगार विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक-** संकीर्ण २०१७/३८८/प्र.क्र.१२२/उद्योग-४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-१२ सप्टेंबर, २०२२

**वाचा :-** १) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१६/प्र.क्र.२१५/उ-४, दिनांक २४ ऑगस्ट, २०१७.
२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस-२०१७/प्र.क्र.२०४/उ-४, दिनांक ०८ डिसेंबर, २०१७.
३) उद्योग विभागाचे परिपत्रक क्र.भांखस-२०१७/४१६/प्र.क्र.१२९/उ-४, दिनांक २९ ऑगस्ट, २०१७

**शासन परिपत्रक :-**

केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती राज्य शासनास वस्तु व सेवांची खरेदी करण्यास संदर्भ क्र.१ व २ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आलेली आहे. सदर पोर्टलच्या माध्यमातून खरेदी करणे सर्व शासकीय विभागांना/कार्यालयांना /महानगर पालिका/ नगरपालिका /जिल्हा परिषदा/ स्वायत्त संस्था/आयोग/ शासकीय अनुदानिक संस्था इत्यादींना बंधनकारक करण्यात आले आहे. राज्य शासन व गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) यांच्यादरम्यान दिनांक २१.०३.२०१८ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

२. केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) या वेब पोर्टलवर सद्यस्थितीत ४५ लाखांपेक्षा जास्त उत्पादक व विक्रेते, तसेच ६०,००० खरेदीदार नोंदीत आहेत. नुकतेच केंद्र शासनाने सहकार क्षेत्रातील संस्थांना खरेदीदार म्हणून गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेसवर नोंदीत होण्यास मुभा दिलेली आहे. सदर वेब पोर्टलच्या माध्यमातून खरेदीची प्रक्रिया अतिशय सुटसूटीत असून, विशिष्ट विर्निदेश असलेल्या वस्तू सदर वेब पोर्टलच्या माध्मातून, वाजवी किंमतीत खरेदी करता येतात. तसेच सदर वेब पोर्टलद्वारे खरेदी करताना जास्तीत जास्त पर्याय ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध होऊन, खरेदी पध्दतीत पारदर्शकता येणार असून, योग्य त्या वस्तू प्रचलित बाजारभावापेक्षा कमी किंमतीत खात्रीशीर रितीने उपलब्ध होतात. त्यानुषंगाने खरेदीदार विभागांना ज्या

वस्तूंची खरेदी करावयाची आहे त्या वस्तू वेब पोर्टलवर उपलब्ध नसल्यास तसे गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) यांना कळविल्यास, त्या वस्तू विक्रीसाठी गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) च्या माध्यमातून उपलब्ध होतील.

३. गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) या वेब पोर्टलद्वारे राबविण्यात येणारी खरेदी पध्दती ही मानवी हस्तक्षेपाशिवाय असून, कमी कालावधीत योग्य वस्तूंची खरेदी संपूर्णत: ऑनलाईन पध्दतीने करता येते. परिणामी खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता येऊन, नेमक्या व योग्य नामांकित दर्जांच्या वस्तूंचा पुरवठा वाजवी किंमतीत एकाच छत्राखाली (Under one Platform) स्पर्धात्मक पध्दतीने विनासायास (Hasslefree) विविध विभागांना खरेदीसाठी विविध वस्तूंच्या खरेदीसाठी उपलब्ध होतो.

४. मा. मुख्य सचिवांच्या राष्ट्रीय परिषदेच्या दिनांक १५.०६.२०२२ ते दिनांक १७.०६.२०२२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या परिषदेत मा. पंतप्रधानांनी राज्यांनी त्यांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांसाठीची खरेदी प्रक्रिया ही गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) या पोर्टलच्या माध्यमातून, परिणामकारकपणे राबविण्याबाबत सूचित केलेले आहे. त्यानुषंगाने मा. मुख्य सचिव यांनी राज्यातील मुख्य खरेदीदार विभागांनी नगर विकास विभाग, सामाजिक न्याय विभाग, ग्रामीण विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, महिला व बालविकास विभाग, शालेय शिक्षण विभाग इत्यादींनी खरेदीची प्रक्रिया हि गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) या वेब पोर्टलच्या माध्यमातून प्रभावीपणे राबविण्याबाबत सूचित केलेले आहे. तसेच संबंधित व इतर सर्व विभागांनी याबाबतच्या कार्यशाळा आयोजित करण्याबाबत सूचित केलेले आहे.

५. उद्योग विभागाच्या दिनांक २९.०८.२०१७ रोजीच्या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व खरेदीदार विभागांना सदर पोर्टलमार्फत खरेदी करण्यासाठी तसेच सदर पोर्टलवर नोंदणी करण्यासाठीच्या प्रक्रियाबाबतच्या कार्यप्रणालीची सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

६. उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने नमुद करण्यात येते की, यापूर्वी उद्योग विभागामार्फत संदर्भ क्र.१ व २ अन्वये राज्य शासनाच्या सर्व विभागांना व त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व कार्यालयांना खरेदी प्रक्रिया राबवितांना सदर खरेदी प्रक्रिया हि केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) या वेब पोर्टलच्या माध्यमातून खरेदी प्रक्रिया राबविणे बंधनकारक करण्यात आले आहे. तरीदेखील, सद्यस्थितीत असे निर्दशनास आले आहे की, काही खरेदीदार विभाग हे वस्तू व सेवांसाठीची खरेदी प्रक्रिया राबवितांना गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) या वेब पोर्टलच्या न करता, खुल्या बाजारातील पुरवठादारांकडून करतात.

७. यानुषंगाने राज्य शासनाच्या सर्व विभागांना पुनःश्च सूचित करण्यात येते की, आपल्या स्तरावरुन तसेच आपल्या अधिनस्त कार्यालयांकडून वस्तू व सेवांसाठीची खरेदी प्रक्रिया राबवितांना गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस

(GeM) या वेब पोर्टलच्या माध्यमातून जास्तीत जास्त खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावे, जेणेकरुन खरेदी प्रक्रियेमध्ये पारदर्शकता, तसेच कार्यक्षमता वाढीस लागून, शासनाच्या फार मोठ्या निधीची बचत होण्यास मदत होईल.

८. त्यानुषंगाने राज्य शासनाच्या सर्व खरेदीदार विभागांनी व त्यांच्या अधिनस्त असलेल्या कार्यालयांनी तसेच महानगरपालिका/नगरपालिका/जिल्हा परिषदा/स्वायत्त संस्था/आयोग/शासकीय अंगीकृत उपक्रम/ शासनाच्या अधिपत्याखालील मंडळ/महामंडळ/शासकीय अनुदानिक संस्था इत्यादी अंतर्गत येणाऱ्या कार्यालयांनी वस्तू व सेवासाठीची खरेदी करताना केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) या वेब पोर्टलच्या माध्यमातून करावी.

९. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे. त्याचा सांकेतांक 202209201738468210 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ. हर्षदीप कांबळे)
प्रधान सचिव (उद्योग)

प्रति :-
१. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
२. सह सचिव, मा. मुख्य सचिव यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२
३. निवडनस्ती